MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

कलेक्टर अविनाश पाठक गोदापात्रात वाळू माफीयांचा नंगानाच खोमणेच्या डोळ्यादेखत कमाई येणं बंद झालं म्हणून खोमणे च्या पोटात गोळा उठला.? वाळू माफियांनी हप्ते देणे बंद केलं म्हणून खोमणेला झोंबलं? अनेक पोलीस अधिकारी वाळू माफियांकडून मोठे मोठे हप्ते घेतात ते पुढील अंकात वाचा? गेवराई महसूल चे मंडळ अधिकारी तलाठी मालामाल

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२८२ | शुक्रवार दि.०५ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -282 | FRIDAY DT. 05 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# अवैध वाळू उपशाकडे दुर्लक्ष करुन, झोपेचे सोंग घेणारे
# मंडळ अधिकारी आंधळे व तलाठी दांडगे हे निलंबित

## जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे रुजू होताच कामकाजात हलगर्जीपणा करणाऱ्यांना दणका

## गेवराई महसूल विभागात मोठी खळबळ; महसूल कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले!

### गेवराई महसूल विभागात अजून अधिकारी आहेत. ते वाळू माफियांना पाठबळ देऊन हप्ते गोळा करतात?

### राक्षसभुवनप्रमाणे राजापूर येथूनही वाळू चोरी; संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावरही निलंबनाची टांगती तलवार असल्याची चर्चा?

### अवैध वाळू चोरीप्रकरणी दैनिक महाराष्ट्र आरंभ वृत्तपत्राने वारंवार बातम्या प्रसिद्ध करून आवाज उठवला होता!



# डोळेझाक

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून त्याची वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तालुक्यातील राक्षसभुवन गोदापात्रातून अवैध वाळू उपसा रात्र दिवस खुलेआम सुरु असताना, याकडे दुर्लक्ष करून झोपेचे सोंग घेणारे गेवराई महसूलचे अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दि.०४ जुलै रोजी निलंबनाची कारवाई करून दणका दिला आहे. यामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

गेवराई तालुक्यात वाळूचा विषय नेहमीच चर्चेत आहे. अवैध वाळू उपसा सुरू असताना, याकडे महसूल प्रशासनाची हाताची घडी अन् तोंडावर बोट अशी भूमिका होती. याप्रकरणी दैनिक महाराष्ट्र आरंभ वृत्तपत्राने वारंवार आवाज उठवून प्रशासनाला जाग आणून तसेच प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

त्या अनुषंगाने दि.०३ जुलै रोजी राक्षसभुवन येथे एसडीएम कविता जाधव यांनी गोदापात्रात जाऊन ड्रोनच्या सह्याने वाळूची पाहणी केली होती. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रमाणात अवैधरीत्या वाळू उपसा झाल्याचे आढळून आले. अवैध वाळूच्या उपशावर लक्ष ठेवणे ही तलाठी व मंडळ अधिकारी यांची जबाबदारी आहे. परंतु ही जबाबदारी पार पाडण्यात धोंडराईचे मंडळ अधिकारी पुरूषोत्तम आंधळे व राक्षसभूवन सज्जाचे तलाठी किरण दांडगे हे अपयश ठरले, तसेच प्रशासकीय कामात हलगर्जीपणा दाखवत कर्तव्यात कसूर केल्याने बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मंडळ अधिकारी आंधळे व तलाठी दांडगे यांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत. अवैध वाळू उपशामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे धोंडराईचे मंडळ अधिकारी पुरूषोत्तम आंधळे व तलाठी किरण दांडगे यांना निलंबित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे रुजू होताच कामकाजात दुर्लक्ष करणाऱ्या या दोन अधिकाऱ्यांना दणका दिला आहे. यामुळे गेवराई महसूल विभागात खळबळ उडाली आहे. या कामगिरीमुळे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचे अभिनंदन व वाळू माफियांना पाठबळ देणाऱ्या हप्तेखोर विरोधात कार्यवाही केली म्हणुन जोरदार चर्चा सुरु आहे. गेवराई महसूल विभागात अजून अधिकारी आहेत. ते वाळू माफियांना पाठबळ देऊन हप्ता वसुल करण्याचे काम करतात. अशा अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावरही कारवाई व्हावी, राक्षसभुवन प्रमाणे राजापूर येथूनही गोदावरी नदीच्या पत्रातून वाळू चोरी होत असल्याने येथील संबंधित मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्यावरही निलंबनाची टांगती तलवार असल्याचे सांगण्यात येत आहे.

गेवराई : तालुक्यातील राक्षसभुवन परिसरात अनेक दिवसापासून अवैध वाळू उपसा चालू होता.परंतु या ठिकाणचे तलाठी किरण दांडगे हे सज्जावर राहत नव्हते.व मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे हे देखील सज्जावर जात नसत.त्यामुळे वाळू माफियांना कोणाचा धाक राहिला नव्हता.तलाठी व मंडळ अधिकारी हे सज्जावर जात नाहीत.यांना सज्जावर पाठवा असे निवेदन छावा क्रांतिवीर सेनेकडून गेवराई तहसीलदार यांना देण्यात आले होते.परंतु तलाठी,मंडळ अधिकारी हे सज्जावर गेले नाहीत.म्हणून वाळू चोरीला गेली असे छावा संघटनेकडून मा.जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते.व त्यांचा पाठपुरावा देखील चालू होता.

त्याअनुषंगाने दिनांक ३/७/२०२४ रोजी राक्षसभुवन ता. गेवराई येथील वाळूघाटाची पाहणी केली असता.असे आढळून आले तेथे मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या वाळूचे उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले. वाळूच्या अवैध उत्पन्नामुळे शासनाच्या मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे संबंधित तलाठी किरण दांडगे व मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे हे शासकीय कामकाजात हलगर्जीपणा दाखवत कर्तव्यात सचोटी परायनता न ठेवता गंभीर स्वरूपाची बाब आहे. त्यामुळे तलाठी व मंडळ अधिकारी यांचे निलंबन करण्यात आले आहे असे आदेशात म्हटले आहे. या कारवाईमुळे अधिकाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.

तसेच यापूर्वी अनेक वेळा राक्षसभुवन येथून वाळू चोरीच्या व तलाठी मंडळ अधिकारी हे सज्जावर जात नसल्याच्या अनेक बातम्या दैनिक महाराष्ट्र आरंभने प्रकाशित केल्या होत्या.

## छावा क्रांतिवीर सेनेकडून जिल्हाधिकाऱ्यांना वेळोवेळी दिले होते निवेदन.!


आरंभ
छावा क्रांतिवीर सेनेच्या निवेदनाचे
एक हजार ब्रास वाळू चोरी प्रकरणी चौकशी
जिल्हा गौण खनिज अधिकारी यांचे उपविभागीय अ

दणका

सायं दैनिक महाराष्ट्र आरंभने वेळोवेळी वाळू चोरीच्या बातम्या केल्या होत्या प्रसिद्ध.


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात - मो.9860898564

तहसीलदार,मंडळ अधिकारी,व तलाठी यांच्यातील वाळू माफियांना सांभाळ नारा कोण?

आपल्याला माहीत असल्याचे सांगितले. परंतु वरिष्ठ अधिकारी हे कार्यवाही बाबत सांगत नसल्याचे त्यांनी सांगितले.तसेच जिल्हा गौण खनिज अधिकारी यांना याबाबत सामाजिक कार्यकर्ते यांनी विचारले असता एक दिवस तुम्ही राक्षसभुवन फाट्यावर गाड्या आडवा आम्ही ऐवून कारवाही करू.याचा अर्थ म्हणजे प्रशासनातील अधिकारी यांच्यावर त्यांचा विश्वास नाही असे स्पष्ट होते.

गेवराई पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना अवैध्य वाळू वाहतूक,व वाहतूक करणारे हायवा ची स्पीड बाबत सामाजिक कार्यकर्ते यांनी विचारले असता वाळू वाहतूक बंद आहे,दुसरं काही काम असेल तर कळवा असे त्यांनी सांगितले.मग बांगर साहेब हे काम नाही का?

महसूल व पोलिस प्रशासनातील अधिकारी यांनी जर मनावर घेतले तर वाळूचा साधा एक खडाही चोरी होऊ शकत नाही.परंतु अधिकारी यांना कारवाही करायचीच नाही.आणि थातुर मातुर कारवाया करून पब्लिसिटी मिळवायची असा कार्यक्रम सुरू आहे. निवडणुकीची आचारसंहिता संपताच अवैध्य वाळू उपसा या प्रक्रियेतील सर्व अधिकारी यांची चौकशी करण्याची मागणी छावा क्रांतिवीर सेनेकडून मा.विभागीय आयुक्तांकडे करणार आहे:- राहुल चाळक

30 Apr 2024 - Page 4 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134

# गजानन बँकेची एटीएम सेवा सुरू

## जिथे विश्वास सार्थकी लागतो तिथेच पैसा गुंतवा - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड (प्रतिनीधी)**

**पारदर्शक व्यवहारामुळेच गजानन बँकेला संपूर्ण राज्यातून प्रथम दर्जाचा मान मिळाला आहे. बाजारपेठेत काही ठिकाणी अस्थिरता आहे ग्राहकांना फायदा होण्याऐवजी तोटाच होऊ लागला आहे त्यामुळे आपला विश्वास जिथे सार्थकी लागतो तिथेच आपला पैसा गुंतवावा असे आवाहन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले असून आज गजानन सहकारी बँकेच्या एटीएम सेवेचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला.**

बीड येथील श्री गजानन नागरी सहकारी बँकेच्या वतीने एटीएम सेवेचा शुभारंभ माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे, अरुण डाके, गंगाधर घुमरे ,विलास बडगे, बाबुशेठ लोढा, गणपत डोईफोडे, शिवाजीराव जाधव, नगरसेवक मुखीद लाला, खदीर भाई, अ‍ॅड.सय्यद खाजा, जमील भाई, सखाराम मस्के, नानासाहेब काकडे, विजय सरवदे, सतपाल लाहोट, सुभाष क्षीरसागर, नवनाथ घोडके, कल्याण खांडे, अर्जुन बहिरवाळ, नागसेन मस्के, राणा चौहाण, बंडू निसर्गंध, प्रकाश कानगावकर, प्रकाश इंगळे, दादासाहेब मुंडे, शेख नसीर, मैनू मौलाना, अक्षय रणखांब आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, आज गजानन बँकेच्या एटीएम सेवेचा शुभारंभ होत आहे. दैनंदिन गरज आणि सरळ सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही सुविधा उपलब्ध केली आहे. गजानन बँक ही सामान्य ग्राहकांची बँक झाली आहे ठेवीदारांचा विश्वास जपत बँक व्यवहार करत असून मराठवाड्यात शाखा विस्तार होत आहे. पारदर्शकतेमुळेच बँकेला प्रथम दर्जाचा मान मिळाला असून



बाजारपेठेत काही ठिकाणी सध्या अस्थिरता निर्माण झाली असून ग्राहकांना फायदा होण्याऐवजी तोटेच सहन करावे लागत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने आपला विश्वास जिथे सार्थकी लागतो तिथेच आपला पैसा गुंतवावा खाजगी बँकांवर अनेक आव्हाने आहेत तरीसुद्धा नियमानुसार ज्या बँकांचे व्यवहार सुरू आहेत

सध्या शहराचे काही प्रश्न भेडसावत आहेत पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे त्यासाठी १६ बैठका झाल्या पण हा प्रश्न कायम आहे यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे अनेक विकासाचे प्रश्न सोडून घेण्यासाठी आपला प्रयत्न सुरू असतो. शासन दरबारी कायमस्वरूपी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य समजतो सध्या सामान्य नागरिकांनी डोळसपणे आगामी काळात विचार करण्याची गरज आहे असे सांगून त्यांनी उपस्थित ग्राहकांना एटीएम सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

यावेळी बँकेचे संचालक अरुण गोरे, अ‍ॅड.राजेश तांगडे, दिनकर कदम, राजेंद्र मुनोत, शेख हुसेन, शरद ढाकणे, अ‍ॅड.दत्तात्रय डोईफोडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ.एम.एस. शेख, व्यवस्थापक व्हि.एल. कुंबेफळकर, सहाय्यक व्यवस्थापक के.ए. लांडे, आय.टी.व्यवस्थापक अनंत आडसुळे यांच्यासह अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे यांनी केले यावेळी त्यांनी १५० महिला बचत गटांना कर्ज उपलब्ध करून दिले असून सर्वसामान्य माणसाला ५० हजार ते २ लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले असल्याचे सांगितले सामान्य माणसाच्या ठेवीला सुरक्षितता असून आरबीआयच्या नियमानुसार गजानन बँकेचे व्यवहार चालू असल्याचे ते म्हणाले. श्री गजानन नागरी सहकारी बँकेच्या वतीने एटीएम सुविधा सुरू केल्यामुळे ग्राहकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार आदेश नहार यांनी मानले. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात गणेश लोखंडे, सुरवसे, शेख मोहसीन यांचा सत्कार करण्यात आला तर आर्किटेक्ट इंजिनियर जीवन डोळस आणि खातेदार शेख जमील यांचाही बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

---

### आदिशक्ती संत श्री मुक्ताबाई च्या पालखी सोहळ्यात समर्थांची समर्थवाणी

# जयदत्तजी क्षीरसागरांच्या शुभहस्ते प्रकाशन

बीड (प्रतिनीधी)

येथील सुप्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंकेंनी मराठा तितुका मिळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा सांगत स्वराज्य हित सांगणाऱ्या श्री समर्थ रामदास स्वामींच्या जगप्रसिद्ध दोनशे पाच मनाच्या श्लोकावर निरूपण करणारे पुस्तक लिहिले आहे.त्याचा प्रकाशन सोहळा इहपर लोकी सुखी। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी।। मिथ्या कल्पना मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा म्हणत मोठ्या आर्ततेने ज्ञानेश्वर माऊलींना हाक देणाऱ्या संत श्री आदिशक्ती मुक्ताबाईच्या पालखी सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे माजीमंत्री जयदत्तजी क्षीरसागरसाहेबांच्या शुभहस्ते आदिशक्ती संत श्री मुक्ताबाईंच्या पालखी सोहळ्याचे प्रमुख हरि भक्त परायण परमपूज्य गुणनिधान श्री हरणे महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रकाशन सोहळा संपन्न




झाला.प्रकाशन सोहळ्याच्या अनुषंगाने जयदत्तजी क्षीरसागर म्हणाले समर्थांची समर्थवाणी कालातीत निरंतर समर्थ आहे. त्या अनुषंगाने सुरेशने पुस्तकास दिलेले शीर्षक हे निश्चितच अर्थपूर्ण आहे... अभ्यास पुर्ण आहे.दै.पार्श्वभूमिमधुन निरंतर चालवलेल्या सदर हे पुस्तक रुपाने समाजत येते हि आनंदाची गोष्ट आहे.निवेदन क्षेत्रामध्ये स्वतःची ओघवती शैली निर्माण करून यशस्वी झालेला सुरेशचा अध्यात्मिक क्षेत्रामध्ये पुस्तक लिखाणाचा पर्यंत यशस्वी होईल कारण सुरेशची सजगता हि सृजनशील आहे.सोशल मिडियातुन सुरेशचे प्रसिद्ध होणारे शिवपुष्प आणि चित्रोळी हे सदर सुद्धा वाचनीय असतात. तर ह.भ.प. हरणे महाराज म्हणाले मनाच्या श्लोकाची आज समाजाला नितांत गरज आहे आणि त्याच वेळी समर्थांची समर्थवाणी पुस्तक प्रकाशित होते आहे हि मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.यावेळी पालखी सोहळ्यामध्ये दोनशे पाच वारकऱ्यांना समर्थांची समर्थ वाणीचे वितरण इच्छापुर्ति गणेश भक्तांच्या शुभ हस्ते वाटले.जणांना पुस्तक प्रकाशन सोहळा यशस्वी करण्यासाठी सुरेश साळुंकेंच्या सर्व मित्र परिवाराने परिश्रम घेतले.पुस्तक प्रकाशना प्रसंगी सर्व पत्रकार बांधवानी मित्र परिवाराने शुभेच्छा दिल्या.

---

# भगवानगडाच्या पालखीचे शुक्रवारी होणार पंढरपूरकडे प्रस्थान

भगवानगड (प्रतिनीधी)

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाची पालखी शुक्रवार दि.५ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे शुक्रवार दि.५ जुलै रोजी दुपारी ठीक दोन वाजता पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, संत भगवानबाबा संस्थान बोरकिन्ही, भाग्येश्वर संस्थान, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान औरंगाबाद-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ कानिफनाथ संस्थान खोकरमोह,




सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली निघणाऱ्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती राहणार आहे.

---

# पुण्याच्या संमीद्रा फाउंडेशनने २०० आदिवाशी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला दिला आधार

### वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य दिल्याने मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता

शिरूर कासार :(प्रशांत बाफना)

सध्याच्या परस्थितीत शिक्षण म्हणजे फक्त श्रीमंतांनी घ्यावे अशी परस्थिती निर्माण झाली आहे. भरमसाठ फी वाढ, शैक्षणिक साहित्याच्या वाढलेल्या किंमती सारासार विचार करता गरिबाला शिक्षण परवडेना झाले आहे. त्यामुळे पुणे येथील सामाजिक संस्था, समिद्रा फाउंडेशन यांनी ही गरज ओळखून बीड जिल्ह्यातील २०० आदिवाशी विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला मोठा आधार दिला आहे.पेन्सिल,खोड रबर,पेन, वही, चित्रकला वही, रंग पेटी, आणि चांगल्या प्रतीचे दफ्तर पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहतांना दिसत होता.

ओसतोड मजुरांचा तालुका म्हणून ओळख असलेल्या शिरूर कासार तालुक्यात शैक्षणिक आलेख हळू हळू वाढत असून गेल्या दहा वर्षापासून पुणे, मुंबई, अहिल्यानगर येथील सामाजिक संस्था व सामाजिक कार्यकर्ते या तालुक्यातील विद्यार्थ्यांना



शैक्षणिक मदत करत असल्याने गुणांवत्ते बरोबर विद्यार्थ्यांची उपस्थितीचा टक्का सुद्धा वाढत आहे. पुण्याची संमिद्रा फाउंडेशन, निरंजन सेवाभावी संस्था अश्या विविध संस्था विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबर दुर्गम, ग्रामीण भागातील मुलांना शाळेला येण्याजाण्यासाठी सायकल,ठज फिल्टर पाणपोई,डिजिटल क्लास रूम, टॅब अश्या विविध शैक्षणिक आलेख वाढणाऱ्या उपयोगी वस्तू देत असल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणातील गोडी वाढत आहे. काल पुणे येथील संमिद्रा फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सदाशिव थोरात यांनी शिरूर कासार तालुक्यातील भटक्या समाजातील २०० आदिवाशी विद्यार्थ्यांना एक वर्ष पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य दिले.गेल्या वर्षी सुद्धा या संस्थेने १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन शिक्षणाला आधार दिला होता. भिल्ल, पारधी, घिसाडी, वडार, वैदू, डब्यातील आईवाले, वासुदेव, बहुरूपी या समाजातील मुलांना शिक्षणाचा वारा लागवा म्हणून अगदी शहराच्या जवळच जिल्हा परिषद प्राथमिक रामनगर वस्तीशाळा असून या शाळेसह, दुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शिंदेवस्ती शाळा,ऐन डोंगराच्या कुशीतील जिल्हा परिषद उथळावस्ती शाळा अश्या शाळेतील मुलांना या शैक्षणिक किट वाटप करून त्यांना शिक्षणात मोठा आधार दिल्याचे त्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंदातुन स्पष्ट दिसत होते.यावेळी या संस्थेचे अध्यक्ष सदाशिव थोरात, एकलव्य संघटनेचे प्रांत अध्यक्ष युवराज बर्डे, जालिंदर विद्यालयाचे माजी प्राचार्य दादासाहेब खोले, अप्पासाहेब शिंदे सर, कन्नालाल खामकर सर, दिपक केदार सर, अंदुरे सर, पाखरे मॅडम,विष्णू माळी, तुकाराम माळी,गोरख पवार, राम पवार, करण पवार, सूरज पवार,यांच्या सह ग्रामस्थ विद्यार्थी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

---



# पंकजाताई मुंडे यांनी नागपूर येथे केले चंद्रशेखर बावनकुळे व कुटुंबियांचे सांत्वन

**नागपूर (प्रतिनीधी)**

**भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज नागपूर येथे जाऊन भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांचे व त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले.**

बावनकुळे यांच्या मातोश्री सौ. प्रभावती कृष्णराव बावनकुळे यांचे सोमवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले होते. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले होते, आज दुपारी त्यांनी नागपूरला जाऊन बावनकुळे यांची व त्यांच्या परिवाराची भेट घेतली व सांत्वन केले. याप्रसंगी त्यांनी प्रभावती बावनकुळे यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

---

# पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील पूरग्रस्त कॉलनी, रमाई नगर भागात चोऱ्या वाढल्या पोलिसांनी गस्त वाढवावी - रमेश वाघमारे

बीड (प्रतिनीधी)

पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत पूरग्रस्त कॉलनी, रमाई नगर परिसरात गेल्या काही दिवसापासून चोराच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. नागरीकांनी रात्र रात्र जागून काढावी लागत आहे. त्यामुळे पेठ बीड पोलिसांनी या भागांमध्ये रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रमेश वाघमारे यांनी केली आहे. पेठबीड भागात गेल्या काही दिवसांपासून चोराच्या घटनेमध्ये वाढ झाली आहे पुरग्रस्त कॉलनी रमाई नगर या भागामध्ये दररोज चोरटे येत असल्यामुळे नागरिकांनी रात्र जागून काढावी लागत आहे. चोराच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीची वातावरण पसरलेले आहे. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी रमेश वाघमारे यांनी केली आहे.



---

# जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिका चालकाचा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते सत्कार

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

नाणीज येथील जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिका सेवेचे करमाड (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील चालक बाळू अंकुश कातकडे यांचा करमाड पोलीस ठाण्यात पोलीस अधीक्षक मनीष कळवनिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महामार्गावर वेळोवेळी झालेल्या अपघातातील जखमींना तातडीने रुग्णालयात पोहोचवून जीवदान दिल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला.

जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानच्या करमाड येथील रुग्णवाहिका सेवेचे चालक बाळू कातकडे यांचा सत्कार करताना अधीक्षक मनीष कलवानिया.नाणीज येथील संस्थानच्या राज्यातील विविध महामार्गावर एकून ५२



रुग्णवाहिका कार्यरत आहेत. अपघातातील जखमींना त्या मोफत तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करतात. त्यामुळे त्यांचे प्राण वाचण्यास मदत होते. संस्थानच्या या रुग्णवाहिका सेवेने आत्तापर्यंत २३ हजारांवर जखमींचे प्राण वाचवले आहेत.

सत्कारमूर्ती चालक बाळू कातकडे संभाजीनगर जालना महामार्गावरील करमाड पॉईंट येथे कार्यरत आहेत. तिथे संस्थानची रुग्णवाहिका २४ तास कार्यरत असते. करमाड परिसर, शेकटा, गोलगाव फाटा, कुंभेफल, शेंद्रा एमआयडीसी त्या भागात ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरली आहे. या रुग्णवाहिकेने २०२३ मध्ये एकूण ७८ अपघात झाले. तर त्यात ९५ जण जखमी झाले. २०२४ मध्ये १ जून अखेर ७१ अपघात झाले. त्यातील जखमींची संख्या १७५ होती. सर्वांचे प्राण वाचवल्याबद्दल श्री कातखडे यांना गौरवले आहे. पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या हस्ते सत्कार झाला.या प्रसंगी पोलीस निरीक्षक प्रताप नवघरे, सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी, भागातील पोलीस पाटील व जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांचे भक्त उपस्थित होते.

# संत मुक्ताबाई पालखीच्या वारकऱ्याची माळीवेस व्यापारी संघटनेकडून भोजनदान करुन सेवा !



बीड (प्रतिनीधी)

बीड शहरात श्री संत मुक्ताबाई यांची पालखी माळीवेस चौकातील श्री. हनुमान मंदिर या ठिकाणी मुक्कामास आली असता,माळीवेस चौक येथील व्यापारी संघटने कडुन संत मुक्ताबाई पालखीच्या वारकऱ्यांची सेवा भोजनदान करुन करण्यात आली .दरवर्षी एदलाबाद् येथून श्री.संत मुक्ताबाई संस्थान कडुन महान संत असणाऱ्या संत मुक्ताबाई यांची पालखी निघते आणी आषाढी वारी साठी पंढरपूर या ठिकाणी पोहचते. या पालखीत हजारो भाविक पायदळी या पालखी सोहळयात पंढरपुरच्या विठु रायाचे दर्शन घेण्यासाठी जातात.हि पालखी बीड शहरात मोठ्या दिमाखात प्रवेश करते आणी बीडकर हर्षोउल्हासात संत मुक्ताई पालखीचे स्वागत करतात. बीड शहरातील विविध भागातून हि पालखी बीडच्या मध्यस्थानी असणार्या माळीवेस चौकातील श्री. हनुमान मंदीरात मुक्कामी असते. गेली अनेक दशकांपासून या पालखीचे आगमन बीड शहरात होते. या पालखीतील भाविक भक्तांसाठी बीड नगरी नटलेली असतेच परंतु त्यांची मनोभावे सेवा करण्यासाठी बीडकर उत्साही असतात. या पालखीतील वारकऱ्यांना विविध ठिकाणी राहण्याची आणी भोजनाची व्यवस्था अनेक मंडळ,सेवा भावी संस्था, राजकीय मंडळी,व्यापारी वर्ग करत आसतो. संत मुक्ताबाई यांची पालखी ज्या माळीवेस चौकात मुक्कामाला असते त्या माळीवेस चौकातील व्यापारी वर्ग या वारकऱ्यांची सेवा निरंतर करत आलेला आहे. कालच्या पालखी सोहळयासाठी अन्नदान करुन व्यापारी संघटनेने या वारकऱ्यांची सेवा केली. दरवर्षी आगमण होणाऱ्या या पालखी सोहळयातील वारकऱ्यांसाठी माळीवेस येथील व्यापारी तत्पर असतात. यंदाच्या अन्नदान सेवेसाठी बाबुलाल जोया.किरण शिंगण,विलास बावणे,गोटु दोडके, विसावा पान सेंटर, अनिल सेल्स अँन्ड सर्विस, बाळासाहेब चहा सेंटर, अमोल आमटे,महादेव सवाई यांनी या वारकऱ्यांची मनोभावे सेवा घडण्यासाठी परिश्रम घेतले.

# प्रभाग क्रमांक २२ मध्ये रात्रीची गस्त वाढवा - नगरसेवक गणेश वाघमारे, रवींद्र कदम



बीड (प्रतिनीधी)

शहरातील अनेक भागात चोरांच्या टोळ्या आधळून येत आहेत. काही भागात चोरीसत्र सुरूच आहे. प्रभाग क्रमांक २२ मध्ये देखील चोरांच्या टोळ्या पहावयास मिळाल्या आहेत. याकडे पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक गणेश वाघमारे रवींद्र कदम यांच्यासह स्थानिक नागरिकांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड शहरात चोरांनी धुमाकूळ घातला आहे. चोरांनी प्रभाग क्रमांक २२ मध्ये अंकुश नगर, संत नामदेव नगर, नरसोबा नगर, जुना धानोरा रोड या भागात चोरांचा वावर वाढलेला पहावयास मिळाला. अनेक ठिकाणी घरफोड्या केल्या आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे या भागात गस्त वाढविण्यात यावी तसेच स्थानिक भागातील युवकांना गस्त घालण्याची परवानगी द्यावी. तसेच स्थानिक नागरिकांना पोलीस प्रशासनाने गस्त घालण्यासाठी ओळखपत्र देण्याची मागणी देखील नगरसेवक गणेश वाघमारे, रवींद्र कदम यांच्यासह स्थानिक नागरिकांनी शिवाजी नगर पोलिस स्टेशन चे पी.आय.श्री.खेडकर यांना निवेदनाद्वारे केली आहे. खेडकर यांनी यासंदर्भात एस.पी. साहेबांशी चर्चा करून घेण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी बापू वाघमारे, प्रकाश काळे, दि.स. थीगळे, कृष्णा मस्के, सुशील लोखंडे, गणेश फाटक, योगेश वीर, अवी उबाळे, राजेंद्र पिंगळे, डी.आर.पुरी, महादेव जाधव, सत्यजित जाधव,प्रीतम कुशेर यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने निवेदन देण्यासाठी उपस्थित होते

# आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे-शिरसाठ यांचा सेवापुर्ती कार्यक्रम संपन्न

## बिजुताई ढाकणे यांचे कार्य म्हणजे सेवा परमोध

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

आरोग्य विभाग बीड अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात दि. २६ फेब्रुवारी १९८६ ते ३० जून २०२४ या कालावधीत आपली सेवा लोणी, मानूर ,शिरूर कासार येथे ३८ वर्षे ४ महिने ४ दिवस पूर्ण करत बिजूताई जगन्नाथ ढाकणे या सेवानिवृत्त झाल्या. आपल्या संपूर्ण सेवेत त्यांनी सामान्य माणसाच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत खूप प्रामाणिक व जबाबदारीने सेवाकार्य पार पाडले आहे. बीजुताई ढाकणे यांनी संपूर्ण सेवेत कामाला प्रथम प्राधान्य दिले.कार्य हेच ध्येय मानून काम केले त्यामुळे त्यांना अधिकच्या दोन वेतनवाढ मिळाल्या.चांगल्या कामाचे फळ म्हणून त्यांना मुंबई येथे २००४ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट आरोग्य सेविका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. यावेळी आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे बोलताना म्हटल्या की माझी सेवा यशस्वी होताना अनेकांचे सहकार्य मिळाले. माझे पती लिंबाजी शिरसाट व परिवारातील सर्व सदस्यांची खूप खूप साथ मिळाली.मला कोणतेही वाहन चालवता येत नाही पण कधीही माझे काम थांबले नाही.जेंव्हा ज्यांना जी गरज आहे त्यांना ती मदत करण्याचा प्रयत्न केला.माझ्या संपूर्ण सेवेत एकही शासकीय तक्रार नाही.शासकीय अधिकारी,सहकारी व लोक यांच्याशी स्नेहाचे नाते जोडत मी माझे कार्य पूर्ण करत राहिले व यामध्ये मला सर्वांचे सहकार्य मिळाले.माझ्या सेवेत एक घटना नेहमी मला प्रेरणा ऊर्जा देत असते. आरोग्य सेवा ही जनसेवा अर्थात ईश्वरसेवा मानूनच मी ते व्रत केले . आरोग्य अधिकारी, सहकारी वर्गाचे खूप सहकार्य मिळाले.माझ्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व जनता जनार्धनाचे खूप सहकार्य मिळाले. मी त्यांना जे सांगत



असायचे त्याबाबतीत ती माणसं माझ्या विचारांना स्वतःच्या कृतीत आणत असायची याचा मला खूप अभिमान आहे. सेवा परमो धर्म या ऊक्तीचा उपयोग थोडा का होईना मला माझ्या संपूर्ण कार्यकाळात कृतीत आणता आला याचाही अभिमान वाटतो. सामान्य माणसाचे जीवन व हलाखीची परिस्थिती यामधून त्यांना जी काही यथायोग्य सेवा देता आली ती मी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला,असे मत माध्यमांशी बोलताना त्यांनी व्यक्त केले. ३ जुलै २०२४ या दिवशी सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार येथे त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पार पडला. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून चालू असणाऱ्या योजना लोकांपर्यंत पोहोचकरणे,लसीकरण,साथीच्या रोगतील जनजागृती,कुटुंब नियोजन,शाळा भेटी देऊन मुलांची आरोग्य तपासणी यांसारख्या सर्व सेवा प्रामाणिकपणे देण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोग्य सहाय्यिका बीजूताई ढाकणे-शिरसाट या सेवेतून निवृत्त होत आहेत.एका प्रामाणिक व्यक्ती कडून मिळणारा स्नेह थांबला याबाबत अनेक लोकांच्या मुखातून त्यांची उणीव नक्की भासेल असे उद्गार व्यक्त होत आहे. सेवापुर्ती कार्यक्रम प्रसंगी इंदुवासिनी देवस्थान पिंपळनेर चे श्री १००८ महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद महाराज,श्री सिद्धेश्वर संस्थान शिरूरचे श्री विवेकानंद शास्त्री महाराज, खंडोबा देवस्थान लोणीचे यादव महाराज बडे,श्री नागनाथ देवस्थान मानूरचे श्री ष ब्र १०८ विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज इत्यादीं संत-महंत व प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व अधिकारी,कर्मचारी, ढाकणे-शिरसाठ कुटुंबाचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आवर्जून उपस्थित डॉ.लक्ष्मीकांत तांदळे,डॉ.अशोक गवळी,डॉ.राजेश तांदळे,डॉ.मृणाली घुगे,डॉ.पूजा मस्के, डॉ सुहास खाडे, डॉ गव्हाणे मॅडम, डॉ परमेश्वर बडे, डॉ राहुल सानप सर, डॉ.राठोड सर,सर्वांनीच आदरणीय बीजूताई ढाकणे-शिरसाठ यांना पुढील आरोग्यमय जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या


# जेजेरथ निरडे यांच्या शेतातील आजपर्यंत झालेल्या नुकसानीची भरपाई महसूल विभागाने द्यावी

प्रतिनिधी ।वाल्हे गंगाधर

धारूर तालुक्यातील कचारवाडी येथील शेतकरी जेजेरथ भागवत निरडे यांच्या शेताच्या कडेला गट क्रं १६९ ते १७४ पर्यंत रस्ता काढण्यात आला परंतु रस्ता काढताना शेतकरी जेजेरथ भागवत निरडे यांचे जे शेताचे नुकसान झाले होते ते नुकसान महसूल विभागामार्फत देण्यात येईल असे आश्वासन दिले होते परंतु एक वर्ष उलटूनही अद्याप कोणतीही नुकसान भरपाई देण्यात आली नाही व ती जमीन देखील वहिती योग्य करुन दिलेली नाही, सध्या जमीन आपले कार्यालयाच्या म्हणण्यानुसार पडीक आहे त्याला दुसरे वर्षे चालु झालेले आहे, वेळीच जमीन वहिती योग्य नाही करुन दिली तर शेतकऱ्याला तहसील कार्यालयाकडुन दोन वर्षाचे नुकसान द्यावे लागेल. शेतकऱ्याने यापुर्वी देखील आपले कार्यालयाकडे नुकसान भरपाई मिळणे बाबत मागणी अर्ज केलेले आहेत परंतु या अर्जावर आजपर्यंत कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही. कचरवाडी ठिकाणाचा रहिवाशी असून शेती करून माझी व माझे कुटुंबाची उपजीवक भागवतो मला मौजे हिंगणी बुद्रुक तालुका धारूर शहरात गट नंबर १७० व १७४ मध्ये एकूण ८० आर जमीन आहे सादरचे जमिनीचे मिळणारे उत्पन्नावरच माझे कुटुंबा अवलंबून आहे माझ्या जमिनीचा पूर्व बाजूने एक पाठवाना असलेल्या नाल्या होत्या कोणाला पूर्वपार होता ना त्यामुळे माझ्या जमिनीचे कसलेही प्रकारचे नुकसान होत नव्हते परंतु माझे जमिनीचे पूर्व बाजूने गट नंबर १६९ ते १७४ पर्यंत असलेला पूर्वपार नाल्याचे मधून रस्ता मिळणे करता आपला कार्यालयाकडे अर्ज केला होता त्या अर्जावरून आपले कार्यालय मार्फत रस्ता काढून देण्याचे ठरले त्यानुसार संबंधित मंडळाधिकारी तलाठी व महसूल अधिकारी स्वामी साहेब हे प्रतीक्षा घटनेच्या ठिकाणी आले परंतु त्यांनी पाहणी केली असता त्यांना दिसून आले की रस्ता देता , येतो परंतु आजूबाजूच्या शेतकरी यांचे जमिनीत पाठवा नाल्याची उकारलेली माती टाकावी लागते, त्यामुळे शेती काही वर्ष पडत राहण्याची शक्यता आहे त्यावर उपाय म्हणून जमीन पडत पडलेल्या शेतकऱ्यांना महसूल विभागामार्फत नुकसान भरपाई , यावी लागेल त्याकरता शेतकरी यांना आपण बोलतो व त्यांना समजून सांगून रस्ता पूर्व करण्याची कारवाई करत असे आपसात सर्व अधिकारी यांना तोंडी माहिती समज कल्पनाही शेतकरी यांना दिली फडकजन्यजनुकसान भरपाई मिळेल म्हणून शेतकरी रस्ता खोदू देण्यास व जमीन पडत पडण्यास तयार झाले हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या समक्ष ठरलेले आहे नुकसान भरपाई मिळेल म्हणून शेतकरी देखील तयार झाले, या सर्व बाबीवरून आपले कार्यालय मार्फत दिनांक १२ /२ /२०२३ रोजी पाठवान नाला बांधून घेतला, व नाल्याचे पाणी हे अर्जदाराच्या शेतात तात्पुरते स्वरूपाचे अनेक शेतकरी यांचे समक्ष काढून दिले व अर्जदारास त्याचवेळी कळवली की तुम्हाला नुकसान भरपाई मिळणार आहे, तुम्ही पेरणी नाही केली तर चालेल, त्यानंतर अर्जदाराने अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे त्याचे पडक राहिलेली ८० आर जमीन नुकसान म्हणून रक्कम दीड लाख रुपये भरपाई मिळणे करता मागणी केलेली आहे, परंतु शेतकऱ्यास अद्याप पर्यंत एक वर्ष झाले तरी नुकसान भरपाई मिळालेली नाही व माझी जमीन देखील माहिती योग्य करून दिलेली नाही सध्या माझी जमीन आपल्या कार्यालयाच्या म्हणण्यानुसार पडक आहे त्याला दुसरे वर्ष चालू झालेले आहे मला वेळच जमीन माहिती योग्य नाही करून दिली तर मला दोन वर्षाचे नुकसान द्यावे लागेल याची नोंद घ्यावी मी यापूर्वी देखील आपल्या कार्यालयाकडे नुकसान भरपाई मिळणे ची मागणी केलेली आहेत तरी या वर जीवन कुमार कांबळे तहसीलदार यांनी लवकरच तोडगा काढून ही जमीन पडक राहिलेली तरी आता दुसरा वर्ष चालू झालेला आहे लवकरात लवकर शेतकऱ्याचा नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी जेजेरथ भागवत निरडे यांनी केली होती तरी यांच्या मागणीवरून दाखल घेतली जात नाही तरी जीवन कुमार कांबळे तहसीलदार साहेबांनी नुकसान भरपाई मिळून देण्यात यावी



बार्शी नाका परिसरातील सुप्रसिद्ध मा नगरसेवक लक्ष्मण आणा विटकर व अमोल अहिरे यांच्या माध्यमातून दरवर्षी प्रमाणे यंदाही आषाढी एकादशी निमित्त आनंदगड जालना दिंडीचा मुक्काम भोजनासाठी व्यवस्था करण्यात आली मठाधिपती श्रि भगवान बाबा व्यवस्था करण्यात आली आहे अनेक भाविकभक्त भोज नाचा लाभ घेत आहे परिसरातील जागरूक भावनीक भक्त उपस्थित होते.



बीड - अलीम (भैय्या) जहांगीर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार, इरफान शेख, पोलिस बॉईज असोसिएशन चें महाराष्ट्र राज्य अध्यक्ष - रविंद्र शिनगारे

# पेठ बीड भागातील असंख्य तरुणांचा अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश

## तरुणांची साथ ऊर्जा देणारी- अनिलदादा जगताप

बीड (प्रतिनीधी)

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पेठ बीड भागातील गांधी नगर येथील असंख्य युवकांनी काल दि. ५ जुलै रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान



शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली बीड शिवसेनेत प्रवेश केला. यापैकी पेठ बीड भागातील गांधी नगर येथील अमोल जाधव, आकाश गायकवाड, किरण गायकवाड, लक्ष्मण तात्या गायकवाड, अमर गायकवाड, अतुल गायकवाड, संदिपान जाधव, रोहित जाधव, विरेंद्र जाधव, योगेश सारूख, सचिन जाधव, संतोष धुरंदरे, कृष्णा जाधव, निखिल चव्हाण, यश गायकवाड, विकास गायकवाड, शुभम गायकवाड आणि अक्षय जगताप या सर्व तरुणांचे अनिलदादा जगताप यांनी शिवसेनेत स्वागत करून त्यांना पुष्पगुछ देऊन सत्कार केले. निवडणुकीच्या तोंडावर पेठ बीड भागातील गांधी नगरमधील सर्व तरुणांची मिळालेली साथ माझ्यासह बीड शिवसेनेची ऊर्जा वाढवणारी आहे. असे मत व्यक्त करत अनिलदादा जगताप यांनी शिवसेनेत नव्याने दाखल झालेल्या सर्व तरुणांचे मनःपूर्वक स्वागत केले. या दरम्यान जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्यासह शिवसनेचे पदाधिकारी उपस्थिती होते.

# पिक विमा योजनेस पर्यायी योजना आणण्यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समितीची नेमणूक - धनंजय मुंडे

## विधानसभेतील २९३ च्या प्रस्तावास कृषी मंत्री धनंजय मुंडेंकडून संत तुकाराम वाणीसह उत्तर

मुंबई (प्रतिनीधी)

राज्याचे मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री तसेच कृषिमंत्री म्हणून मी स्वतः पिक विमा कंपन्यांच्या सोबत सातत्याने बैठका घेऊन मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीचा विमा तातडीने वितरण केला जावा, यासाठी वारंवार पाठपुरावा करत असतो. त्यानुसार यावर्षी राज्यात अग्रीम मध्येच विक्रमी पिक विमा वाटप करण्यात आले आहे. मात्र तरीही विविध पीक विमा कंपन्यांचे विमा नुकसान देण्याबाबतचे धोरण आणि दप्तर दिरंगाई याबाबत शेतकऱ्यांच्या व बऱ्याच लोकप्रतिनिधींच्या नेहमीच तक्रारी येत असतात त्यावरून पिक विमा योजनेवरती आपण सर्व समाधानी आहोत असे नाही, त्यामुळेच शेतकऱ्यांना अधिकचा आधार व अडचणीच्या काळात दिलासा मिळावा या दृष्टीने पिक विमा योजनेला पर्यायी योजना आणण्यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास समितीची नेमणूक करण्यात आलेली असून ही समिती देशातील इतर राज्यांमध्ये राबवली जाणारी पिक विमा योजना तसेच ज्या राज्यांमध्ये पिक विमा योजनाच लागू नाही अशा राज्यांमध्ये शेतकऱ्यांना कोणत्या पद्धतीने नुकसानी बाबत लाभ दिला जातो याचा परिपूर्ण अभ्यास करून याबाबतचा अहवाल लवकरच शासनास सादर करेल, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत बोलताना दिली.

विधानसभेत आज २९३ च्या प्रस्तावा नावे विविध सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर दिले. यावेळी सन २०२३ च्या खरीप हंगामात पावसाने झालेल्या नुकसानी पोटी अग्रीम २५% प्रमाणे पिक विमा वितरण करण्यात आले. याद्वारे राज्यात विक्रमी ७००० कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला, तर यापैकी ४००० कोटींपेक्षा जास्त विमा रकमेचे वितरण पूर्ण झाले व उर्वरित रक्कमेचे वितरण सध्या सुरू आहे. विशेष म्हणजे २०१६ पासून आजपर्यंतची विमा वितरणाची ही आकडेवारी रेकॉर्ड ब्रेक असून यामध्ये अंतिम पीक कापणी अहवाला नंतर सरासरीच्या हिशोबाने येणारी पिक विमा रक्कम याची त्यात वाढ होणार असून अंतिम पीक कापणी नंतरचे पीक



विम्याचे वितरण सुद्धा जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण केले जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी सभागृहात सांगितले.

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे जी पाच राज्य विविध पिकांच्या हमीभावाच्या किमतींची शिफारस करतात, त्यामध्ये महाराष्ट्र देखील एक प्रमुख राज्य असून वेगवेगळ्या राज्यांनी विविध पिकांना सुचवलेल्या किमतींमध्ये असलेल्या तफावतीमुळे बऱ्याचदा हमीभावामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत येते. त्यामुळे हमीभाव सुचवताना सर्व राज्यांची सुसुत्रता व एक वाक्यता असावी असे आपण नुकत्याच केंद्रिय कृषी मूल्य आयोगाच्या बैठकीमध्ये प्रस्तावित केले असून याचीही अंमलबजावणी याच वर्षीपासून होणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान आजच्या उत्तरामध्ये धनंजय मुंडे यांनी यावर्षी सरासरी पावसाच्या तुलनेमध्ये राज्यात झालेली पेरणी, बी-बियाणे, खते, कीटकनाशके यांची उपलब्धता, विविध शासकीय योजनांमधील लाभार्थ्यांची आकडेवारी, त्याद्वारे विविध योजनांसाठी खर्च करण्यात आलेला निधी, तसेच अगदी राज्य शासनाच्या कृषी हेल्पलाइन च्या व्हाट्सअप क्रमांकावर आलेल्या तक्रारींच्या निवारणाची आकडेवारी सुद्धा सभागृहामध्ये सांगितली. तर धनंजय मुंडे यांनी संत तुकारामांच्या 'बरे केले देवा कुणबी झालो। नाही तर दंभेची असतो मेलो।' या अभंगवाणीने आपल्या उत्तराचा समारोप करत आपण सर्व लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांची मुले आहोत व सर्वांच्या सहकार्यातून आपण शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करू अशी माहिती दिली.

दरम्यान २०२० मध्ये कडक लॉक डाऊन तसेच त्या काळात झालेली अतिवृष्टी अशा परिस्थितीमध्ये ऑफलाइन पद्धतीने झालेल्या पिक विमा प्रस्तावांच्या संदर्भात केंद्र स्तरावरील अपील तसेच काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून केंद्र स्तरावरील प्रकरणे अपिलात काढून तसेच न्यायालयातील प्रकरणांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय व्हावा या दृष्टीने शासनाच्या मार्फत वकील देऊन सदर प्रकरणे देखील शक्य तितक्या लवकर निकाली काढण्यात येतील. तसेच जुन्या पिक विम्याच्या संदर्भात ज्या ज्या लोकप्रतिनिधींनी स्वतंत्र तक्रारी केल्या आहेत, अधिवेशन संपताच त्या संदर्भात स्वतंत्र बैठका घेऊन याबाबतही तातडीने निकाल घेऊन संबंधित कंपन्यांना पिक विमा देण्यास भाग पाडले जाईल, असेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले.



**मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबईत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची नुकतीच भेट घेतली. यावेळी बीड विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामे, आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तयारीची चर्चा झाली.**

# लाडकी बहीण योजनेचा फायदा १००% घ्या पण लाडकी बहीण आता हुशार झाली आहे - डॉ. नितीन सोनवणे

बीड (प्रतिनीधी)

निवडणुकीच्या तोंडावर सत्ता जाते या भीतीपोटी शिंदे, पवार व फडणवीस सरकारने महिलांना आमिष दाखवून मतदान मिळवण्यासाठी नवीन युक्ती आखली. बहिणीच्या विरोधात बायकोला उभा करणारा व्यक्ती अजित पवार ज्याला बायको निवडणुकीत पडल्यावर बहिणीची माया जागी झाली. या सरकारला निवडणुकीच्या तोंडावरच का लाडकी बहीण आठवली. शक्यतो भावाला बहिणीचे लग्न झाल्यावर जशी वाटणी करताना ना हरकत किंवा चोळी बांगडीवर मालमत्ता पाहिजे असती त्याच पद्धतीने या नाकर्ते, भ्रष्टाचारी सरकारला १५००/- रुपयाच्या बदल्यात सत्ता पाहिजे आहे. अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे प्रभारी डॉ. नितीन सोनवणे यांनी केली आहे.

गॅस सिलेंडर चे भाव काय...??? मिळणारी सबसिडी कुठे गायब झाली, अन्नधान्याचे भाव काय...??? त्यावर ५% ऋद्ध कर लावला, वीज दराचे भाव वाढवले, पाणी पट्टी, घर पट्टी



चे भाव वाढवले, पेट्रोल डिझेल चे भाव किती...??? हे सरकार अजून किती पिळवणूक करणार... भाजीपाल्याचे भाव किती, दुधाचे भाव किती...??? अशी कोणती गोष्ट आहे ज्याच्या किंमती मर्यादेपेक्षा वाढल्या आहेत. लाडकी बहीण आता हुशार झाली आहे. घरादारात जसा मालकी हिस्सा घेतल्याशिवाय राहत नाही तसाच घेत असलेल्या शिल्लक कराचा हिस्सा घेतल्याशिवाय राहणार नाही. ज्यांनी योजना जाहीर केली असे हे महाशय सिंचन घोटाळ्यात ७०,०००,०००,००,००० सत्तर हजार कोटी रुपयांचे घेटाळेबाज आहेत. जनतेचा पैसा खायचा आणि वर तोंड करून सांगायचे आम्ही योजना आणली. माझ्या माय माऊली ह्या अज्ञान नाहीत. निवडणुका लागल्यावर या भ्रष्टाचारी सरकारला निवडणुकीच्या आखाड्यात तोंडावर पाडल्याशिवाय राहणार नाही, ही जाहीर केलेली योजना फक्त घोषणाच राहील असेच शक्यता वाटत आहे. कारण काही दिवसात आचारसंहिता लागणार आहे. त्यानंतर मात्र सरकार कुणाचे सत्तेत येईल सांगता येत नाही.



**बीड (प्रतिनीधी)**

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी च्या धारूर तालुका पदाधिकाऱ्याची बैठकीच आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला प्रमुख उपस्थिती एकतावादी चे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांची होती. पक्षाची संघटनात्मक बांधणी व येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका व विधानसभा निवडणुका संदर्भात सविस्तर अशी चर्चा करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी धारूर तालुका कार्याध्यक्षपदी आंबेडकरी चळवळीतील आबासाहेब जावळे यांची जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली या वेळी तालुका युवा कार्याध्यक्ष संतोष जावळे शहराध्यक्ष विकी भालेराव, दीपक डोंगरे, नितीन पोटभरे, साहेबराव शिंदे, प्रमुख रिपाई कार्यकर्ते उपस्थित होते.**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा पात्र महिलांनी लाभ घ्यावा – राजेंद्र मस्के

## पिवळे व केसरी राशन कार्ड धारकांना उत्पन्न प्रमाणपत्राची गरज नाही..! पैशाची मागणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही..!

बीड (प्रतिनीधी)

राज्य सरकारने नुकतेच ०१ जुलै पासून जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांना मिळावा. योजनेचा फॉर्म सुलभपणे भारता यावा या हेतूने या योजनेचे अवलोकन करून, मोठे बदल करून प्रक्रिया सुलभ केली आहे. शिवाय अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढवली आहे. शहरी व ग्रामीण भागातील सर्व पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

नवीन बदलानुसार वयोमर्यादा २१ ते ६५ वर्षे केली आहे, जमिनीची अट रद्द केली, महाराष्ट्र अधिवास ( डोमासेल ) रहिवासी प्रमाणपत्राची अट रद्द केली आहे, पिवळे आणि केशरी रेशन कार्ड



असेल तर उत्पन्नाचा दाखला देण्याची आवश्यकता नाही. अविवाहित महिलांचा समावेश करण्यात आला आहे.आता अविवाहित, विवाहित, घटस्पोटीत, परित्यक्ता, निराधार, विधवा या पात्र महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजेनेतून दरमहा १५०० रुपयाचा थेट खात्यात लाभ मिळणार आहे. आधार कार्ड, मतदान कार्ड, राशन कार्ड, बँकेचे पासबुक, पासपोर्ट फोटो एवढ्या कागदपत्रांच्या अधारावर ऑनलाईन फॉर्म भारता येईल. तसेच फॉर्म भरण्यासाठी लवकरच मोबाईल ॲप उपलब्ध होणार आहे. फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेत ग्रामसेवक, तलाठी अथवा कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणालाही आगाऊ पैसे देण्याची आवश्यकता नाही. कोणी यामध्ये गैरव्यवहार अथवा पैशांची मागणी करत असेल तर, भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालयास संपर्क साधावा असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# मराठा आरक्षण व शांतता जनजागृती रॅलीस ११ जुलै ला मराठा बांधवांनी उपस्थित राहावे : सुरेश शेळके

किल्ले धारूर । प्रतिनिधि

विस्वाघातकी सरकार सगेसोयरे कायदाची अंमलबजावणी करत नाही व आपल्या मराठा आरक्षणावर कुठलाही ठोस निर्णय घेत नाही. आपले मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली दि.११ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आयोजित केली आहे तरी माजलगाव मतदार संघातील सकल मराठा समाज बांधवांनी होणाऱ्या दि.११ जुलै मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली मध्ये उपस्थित रहावे असे आवाहन मराठा सेवक राजमुद्रा संघटनेचे मार्गदर्शक सुरेश बप्पा शेळके यांनी केले आहे. आपल्या लेकरांच्या न्याय हक्कासाठी दि. ११ जुलै २०२४ रोजी ठिक सकाळी ११ वा. मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली ठेवली आहे तरी माजलगाव मतदारसंघातील सर्व मराठा नेते आजि, माझी, भावी सह त्यांच्या कार्यकर्त्या साहित सोबत घेऊन रॅली मोठ्या संख्येने उपस्थित रहा

मराठा समाज बांधवांनी आपल्या प्रत्येक गावातुन कमीत कमी दोन गाड्या जिप, पीकप, स्कारपीओ आशा चार चाकी दोन चाकी गाड्या तरी घेऊन निर्णय महाबैठकीस उपस्थित रहावे व आपली काळजी घेण्यासाठी पाऊसाळ्याचे दिवस असल्याने पाऊसा पासुन बचाव करण्यासाठी रेन कोट इतर साहित्य पाऊसा पासुन बचाव करण्यासाठी सोयीनुसार आपली सोय आपल्या गाडी सोबत



करायची आहे व लाखोंच्या संख्येने निर्णय महाबैठकीस लाखोंच्या संख्येने मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली उपस्थित रहावे असे आवाहन मराठा सेवक राजमुद्रा संघटनेचे मार्गदर्शक सुरेश बप्पा शेळके यांनी केली आहे.

# कब्रस्तानाच्या संरक्षण भिंतीचे काम अडवून २५ लाखांची खंडणी मागणाऱ्यावर गुन्हा दाखल

धारूर (प्रतिनीधी)

धारुर तहसिल कार्यालय समोरील कब्रस्थान (स्मशानभुमी) येथे समस्त मुस्लीम बांधवाकडुन संरक्षण भिंतीचे काम चालु होते ते काम अडवुन त्या जागेवर येऊन मी एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे सांगत आरोपी सादेक करीम फकीर याने कब्रस्तानाच्या अनुषंगाने दिलेला अर्ज मागे घेण्यासाठी २५ लाखांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

धारूर तहसील कार्यालय समोरील कब्रस्तानचे सध्या संरक्षण भिंतीचे काम चालू आहे. गेल्या अनेक वर्षापासून सदरील कब्रस्तानचे प्रकरण कोर्टात होते परंतु सतत गैरहजर राहिल्याने कोर्टाने त्यांचा दावा फेटाळला आहे. दि. २८/०६/२०२४ रोजी समस्त मुस्लीम बांधव हे त्या कब्रस्थानची विटबंना होत असल्यामुळे एक मिटींग घेवुन स्वखर्चाने निधी जमा करुन संरक्षण भिंत



**बीड तालुक्यातील मांजरसुंबा या गावांमध्ये मध्यरात्री एकच्या सुमारास घराच्या बाजूला भला मोठा साप असून तो शेळ्यांच्या कळपाकडे जात असल्याने त्याला मारू का?असे शेतकऱ्यांनी बीड ते सर्व मित्रांना कळवले.त्यावर सर मित्र सांगितले की सापांना मारू नका आम्ही येत आहोत,रात्री एक वाजता सर्पमित्र दीपक वाघमारे,नागसेन ओव्हाळ, विशाल मिसळे,अजय डाके, जयदीप धुरंधरे यांनी मांजरसुंबा गावाजवळ शेती वस्तीमध्ये जावून पाहिलं तर भला मोठा एक अजगर दर्शनास आला,तो आजगर शेळीच्या कळपात गेला असता तर शेळ्यांना फस्त केले असते.सर्पमित्रांना वेळीच जाऊन शेळ्यांना तर वाचवलच परंतु अजगरला सुद्धा जीवदान दिले.आजगरला पकडून इमामपुर जवळील मानवी वस्तीपासून दूर फॉरेस्टी(जंगलात) सोडण्यात आले.आपल्या भागात साप दिसल्यास सर्पमित्रांना कळवा. ९८३४१४२४०५, ८६६८९०४४८५**


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT